India ECHOES
ONE WORLD ONE HUMANITY
केवळ खाजगी वितरणाकरिता



"ध्यान करा, जसजसे तुम्ही पुढे जाल तसतसे सर्वस्वाचा त्याग करा, जर आपली साधना निर्दोष, नियमीत व दहा नियमांना अनुसरुन असेल तर आपल्याला जाणीव होईल की ज्या चारित्र्यासह आपण जन्मलो होतो ते जाऊन आपण एक असा आत्मा आहोत की ज्याला 'चारित्र्य' असे काहीही नाही."

९ ऑक्टोबर २०१० रोजी मिशनच्या अधिकाऱ्यांकरिता आयोजित केलेल्या 'चारित्र्याची जडण–घडण' या चर्चा–सत्राच्या वेळी गुरुदेवांनी केलेल्या भाषणातून.

२१ सप्टेंबर रोजी उत्तर अमेरिकन मेळाव्याच्या समाप्तीनंतर गुरुदेवांनी आपला वेळ आश्रम व आपले निवासस्थान यांमध्ये व्यतीत केला. सोमवार ते शुक्रवार 'गायत्री' या आपल्या निवासस्थानी व शनिवार– रविवार आश्रमात अशी त्यांनी वेळाची विभागणी केली. गायत्री येथे त्यांनी अभ्यासींच्या भेटी घेतल्या व काही वेळा सत्संगाचे संचालन केले.

एक दिवस 'गायत्री' येथे कॉफी पीत असताना डॉक्टर व रुग्ण यांच्यातील नात्याबद्दल बोलताना गुरुदेव म्हणाले, "विश्वासाच्या अभावी भय प्रवेश पावते".

९ ते २३ सप्टेंबर असे पूर्ण दोन आठवडे गुरुदेवांनी आश्रमात व्यतीत केले.

१६ सप्टेंबर रोजी गुरुदेवांनी पुडुचेरीला (पूर्वीचे पॉन्डिचेरी) भेट दिली. पुडुचेरी, कडुलोर, विल्लप्पुरम व नेवेली येथील सुमारे ६० अभ्यासी व २० बालकांनी ड्युन इको रिसोर्ट येथे त्यांचे हार्दिक स्वागत केले. पुडुचेरी येथील जवाहर नवोदय विद्यालय येथे बाहेरगावहून आलेल्या अभ्यासींची राहण्याची, भोजनाची व सत्संगाची सोय केली होती. सायंकाळी शाळेच्या विद्यार्थ्यांनी गुरुदेवांचे स्वागत केले व काही भजने सादर केली. यानंतर गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले.

१७ सप्टेंबर रोजी सकाळी गुरुदेवांच्या सत्संगानंतर बंधू अजय भट्टर यांनी एक भाषण केले. कलात्मक कथ्थकशैलीत भगिनी वर्जिने यांनी सुंदर नृत्य सादर केले. जवाहर विद्यालयातील सुमारे १० कर्मचाऱ्यांनी साधना सुरू करण्याची इच्छा प्रदर्शित केली. बरोबर प्रवास करणाऱ्या अभ्यासींबरोबर बातचीत करत व विश्रांती घेत गुरुदेवांनी काही काळ व्यतीत केला व संध्याकाळी ४.४५ च्या सुमारास ते चेन्नईकरिता रवाना झाले. गुरुदेवांच्या सान्निध्यात राहण्याचा हा सुखद अनुभव अभ्यासींच्या छोट्या संघाकरिता अत्यंत अनपेक्षित होता.

ओमेगा शाळेला गुरुदेवांनी दोनदा भेट दिली– एकदा वसति–गृहातील विद्यार्थ्यांबरोबर भोजन करण्याकरिता व दुसऱ्यांदा

क्रिकेटचा सामना पाहण्याकरिता. विद्यार्थ्यांचे गायन ऐकून 'या शाळेत गायन–कलेची भरभराट व्हावी' अशी इच्छा गुरुदेवांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी ज्ञानापेक्षाही चातुर्य मिळवावे असे ते या प्रसंगी म्हणाले. ही शाळा हार्वर्ड सारखी असण्यापेक्षा आध्यात्मिक असावी याचे महत्त्व त्यांना अधिक वाटते असे मत त्यांनी व्यक्त केले.

चेन्नई येथील अभ्यासी गुरुदेवांच्या तेथील २ महिन्यांच्या वास्तव्याने सुखावून गेले आहेत. ते गुरुदेवांचे अनेकदा दर्शन घेऊ शकले. गुरुदेवांचे

कार्यालय याकाळात स्थानिक अभ्यासींसाठी सतत खुले असल्याने गुरुदेवांचे दर्शन त्यांना ब–याचदा मिळाले. बरेचदा आठवड्यातील इतर दिवशीही गुरुदेवच सत्संग करवीत असल्याने स्थानिक अभ्यासींना त्याचा लाभ घेता आला.

रविवारच्या सत्संगाने तर सर्वांची ह्रदये आनंदाने ओतप्रोत भरून जातात. रविवारच्या सत्संगात गुरूदेवांचे दर्शन व्हावे यासाठी अभ्यासी संपूर्ण आठवडाभर आतूर असतात. हुबळी, दिंडीगुल आणि इतर केंद्रातून बरेच अभ्यासी गुरूदेवांना भेटण्यासाठी आले होते. गुरूदेवांनी त्यांच्याकडे खास लक्ष पुरविले आणि भरपूर प्रेम दिले.

गुरूदेवांनी त्यांच्या कार्यालयाच्या आग्नेय दिशेला दैवी प्रेमाचे प्रतीक असलेल्या राधा कृष्णाच्या सुंदर संगमरवरी मूर्ती बसविल्या. स्त्रीरूप असलेल्या मूर्तींचे स्थलांतर करण्यात आले आहे. ध्यानकक्षाच्या मुख्य द्वारापाशी असणा–या हिरवळीच्या एका बाजूस पूजा, श्रद्धा आणि अर्चना या मूर्ती बसविण्यात आल्या आहेत. आणि रस्त्याच्या दुस–या बाजूस ध्यानकक्षेकडे तोंड करून गंगेची मूर्ती बसविण्यात येणार आहे.

बी.एम.ए., चेन्नई येथे दि. ९ ते १२ ऑक्टोबर या काळात 'चारित्र्याचा विकास' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. मिशनच्या भारतातल्या कार्यकारीणीचे सदस्य, प्रदेश प्रमुख, केंद्र प्रमुख अश्या विविध कार्यकारी मंडळाचे एकूण १०० सदस्य यात सामील झाले होते.

या सर्व कार्यकारी सदस्यांना गुरुदेवांचे एकच सांगणे होते. दुस–यामध्ये बदल घडवून आणण्याआधी स्वत:मध्ये बदल घडवून आणा. ९ तारखेच्या संध्याकाळी जेव्हा सर्व सदस्यांचे आगमन झाले तेव्हा अचानक गुरूदेवांनी सर्वांबरोबर डॉर्मिटरी 'अ' मध्ये रात्रीचे भोजन करण्याची इच्छा दर्शविली. या कार्यक्रमासाठी ते अत्यंत उत्सुक दिसत होते. त्यांनी सांगितले की, मला सर्वांच्या मनात गोंधळ निर्माण करावयाचा आहे कारण गोंधळातूनच अधिक स्पष्टता समोर येते.

अगदी याच त्यांच्या कथनानुसार उद्घाटनपर भाषणात त्यांनी वेद, महाभारत, रामायण, भगवदगीता इ. मध्ये असलेला विरोधाभास–ज्यामुळे नैतिकता आणि चारित्र्य याबद्दल गोंधळ निर्माण झाला आहे–निदर्शनास आणून दिला. सरतेशेवटी ते म्हणाले कि आपण आपल्या ह्रुदयाचे ऐकले पाहिजे, दूसरे कुणाचे नाही. नंतर जेव्हा त्यांना सांगण्यात आले कि त्यांनी त्यांच्या भाषणात ब–याच गोष्टींचा समज मोडून टाकला आहे ते म्हणाले की, "जो विचार करू शकतो तोच धाडस करु शकतो. आपण विचारांच्या बाबतीत बेधडक असले पाहिजे."

इतर वक्त्यांनी 'चारित्र्य' हा विषय वेगवेगळ्या दृष्टिकोणातून समोर मांडला. योगाच्या दृष्टीकोणातून (बंधू के.एस. बालसुब्रमण्यम), लालाजी महाराजांची शिकवण (बंधू संतोष श्रीनिवासन), शिक्षणातील मूल्ये (बंधू एस. भवानीशंकर), व्यवसायामध्ये चारित्र्याची भूमिका (बंधू प्रमोद सदरजोशी), चारित्र्याची नैतिकतेतील अभिव्यक्ती (बंधू पी. आर. कृष्णा), चारित्र्याची विचारांमधील अभिव्यक्ती (बंधू कॅप्टन बी. चक्रपाणि) आणि दहा नियमाची शिकवण (बंधू एस. प्रकाश) या विषयांवर आधारित सादरीकरणाद्वारे सर्व वक्त्यांनी मूळ विषय स्पष्ट करून सांगितला. सहभागी झालेल्यांपैकी सर्वांनी १० जणांच्या गटामध्ये संलग्न चर्चा करून त्यांचे सादरीकरण केले.



दि. १२ रोजी भगिनी अनुराधा भाटिया यांनी मेळाव्याचा आढावा घेतल्यानंतर आपल्या समारोपाच्या भाषणांत पूज्य गुरुदेवांनी आपला आधीचाच विषय पुढे नेत चारित्र्य व प्रवृत्ती सुधारण्याच्या आवश्यकतेबद्दल काही विशिष्ट मुद्द्यांकडे लक्ष वेधले.

- ❖आपली समाजात वागण्याची पद्धत व वागणूक यांमध्येदेखिल बदल झाला पाहिजे.
- ❖वैयक्तिक दु:खाशिवाय आध्यात्मिक प्रगती शक्य नाही. म्हणुनच बाबुजी महाराज म्हणत की आपण आपल्या मिशनमध्ये अभ्यासींना आरामदायी सुखसोयी पुरवीत नाही.
- ❖नैतिक पतनामुळेच एड्स सारखे रोग निर्माण झाले आहेत. 'गर्भनिरोधक गोळी' ह्या एकमेव कारणामुळे पाश्चिमात्य देशांमध्ये स्त्री–पुरुष संबंधातील नैतिकतेचा नाश झाला आहे.
- ❖आपल्या चारित्र्यनिर्माणाच्या प्रयत्नांत अडथळा ठरणारा महत्वाचा घटक म्हणजे आपल्या इच्छा होत ज्या आपल्या संकल्पशक्तीचाच नाश करतांत. या गोष्टीकडे वक्त्यांनी लक्ष वेधावयास हवे होते.
- ❖जो ह्या जगाला काहिही न देता केवळ उपभोगच घेत असतो तो देखिल अनैतिकच होय.
- ❖तुमच्याकडे जर गरजेपेक्षा एक रुपया जरी जास्त असेल तर तुम्ही वाममार्गाला लागण्याची शक्यता असते. आपले कित्येक अभ्यासी आपल्या पैश्याच्या लालसेपोटी संकटात सापडले आहेत.
- ❖भारतामध्ये लैंगिक नैतिकतेवर खूप जास्त जोर दिला जातो त्याचवेळी अनैतिकतेच्या इतर प्रकारांकडे बघण्याचा दृष्टिकोन मवाळ असतो.
- ❖प्रशिक्षक हे मिशनच्या रक्तवाहिन्या आहेत. त्यांनी आळशीपण झटकून टाकून कामामध्ये गुरुदेवांच्याप्रति निष्ठावान असणे गरजेचे आहे.

बंधू राजेश राठोड यांनी परिसंवादाचे सुत्रसंचालन केले आणि आश्रम व्यवस्थापक बंधू सत्यनारायणन यांनी इतर व्यवस्था अतिशय चोख ठेवली. गुरुदेवांच्या हलवून टाकणाऱ्या भाषणांनी, त्यांच्या चिंतनाने व परस्पर संवादाने सर्व सहभागींसाठी जागे होण्यासाठीच्या गजराचे काम केले.

एकूणच, हा परिसंवाद हृदय व मन या दोहोंकडून भरपूर परिश्रम करुन घेणारा होता. पूज्य गुरुदेव प्रत्येक सत्र अतिशय बारकाईने बघत व ऐकत होते.
दि. १४ ते १९ ऑक्टोंबर दरम्यान, ओशियानिक आणि लॅटिन अमेरिकेसाठी परिसंवाद आयोजित केला गेला होता. पूज्य गुरुदेवांनी उदघाटनाचे भाषण दिले आणि त्यात म्हणाले की मणपक्कमला येणे म्हणजे माहेरी येण्यासारखे आहे आणि ते आध्यत्मिक घरासमान आहे.

ते पुढे म्हणाले, "आपण येथे फक्त हृदयांचा विकास घडविण्यासाठी, स्वच्छ व शुद्ध करण्यासाठी आणि पुर्ववत त्याचा मुळ स्वभाव बहाल करण्यासाठी

येतो. असा स्वभाव जेथे हृदय हे एक प्रेमाचे उपकरण होते आणि त्यामुळे ते इतरांप्रति अनुकंपा, करुणा, एकमेकांविषयीची काळजी, इतरांबरोबर हिस्सेदारी, आणि एकोप्याने वागणे असे मानवी गुण व्यक्त करत असे. अलिकडे ह्या सगळ्या सदगुणांचे अस्तित्वच संपुष्टात आले आहे."

त्यांनी सहा दिवसांपैकी पाच दिवस सकाळचा सत्संग घेतला, दोन लग्नेही लावलीत. बंधू पी.आर. कृष्णा यांनी, 'विविधतेत एकता' ह्या विषयावर भाषण दिले व बंधू संतोष खानजी 'ते आणि मी' ह्या विषयावर बोलले.

सायंकाळी गुरुदेव अभ्यासींच्या वेगवेगळ्या गटांना आपल्या कार्यालयात भेटत होते आणि त्यांच्याशी बराच वेळ बोलत होते. ते न्युझिलंड आणि ऑस्ट्रेलियाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेलादेखिल उपस्थित राहिले. ह्या सभेला एकूण ५०० अभ्यासी उपस्थित होते ज्यामध्ये १०० लॅटिन अमेरिकन, १५ ला रीयुनियन आणि उर्वरीत सर्व ओशियानीयाचे होते.

गुरुदेवांनी दररोज सत्संगाचे संचालन केले व त्यांनी उदघाटनाचे व समारोपाचे भाषण देखिल केले.

स्मृती स्वयंसेवकांची बैठक – मध्यप्रदेश

दि. २२ ऑगस्ट २०१० रोजी, मध्यप्रदेश विभागातील वेगवेगळ्या केंद्रांच्या , स्मृतीच्या (SMRTI) स्वयंसेवकांसाठी एका बैठकीचे आयोजन जबलपुर आश्रमामध्ये करण्यात आले होते. एकूण ४५ स्वयंसेवक ह्या बैठकीला उपस्थित होते. केवळ इंदोर, भोपाळ, जबलपूर ऊज्जैन सारख्या मोठ्या केंद्रांतीलच नव्हे, तर छोटे व लांब असलेल्या बालाघाट, टिकमगड, जावरा, सोहागपूर, गैरासपूर, त्योंडा, गंजबासोदा, इटारसी, रेवा, नसरुल्लागंज, आणि इतर केंद्रांतून देखील स्वयंसेवक आले होते.

बंधू राजेश रवेरकर यांनी सहभागींचे स्वागत केले आणि त्यानंतर सगळ्यांनी आपापली ओळख करुन दिली. बंधू विनोद यांनी कार्यक्रमाची सुरुवात केली आणि 'व्हिस्पर्स फ्रॉम द ब्राईटर वर्ल्ड' मधील एक सन्देश वाचून दाखविला.

मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षणाच्या (व्हि.बी.एस.ई.) सादरीकरणानंतर त्याच्या विविध पैलुंवर चर्चा करण्यात आली. यावेळी निर्णय घेण्यात आला की प्रत्येक केंद्रामधून किमान एक शाळा निवडून त्याठिकाणी मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षण सुरु करण्यासाठी एकत्रित प्रयत्न करायचे. तसेच युवकांसाठी जास्तीत जास्त कार्य हाती घेण्याची गरज व्यक्त करण्यात आली. सहभागी स्वयंसेवकांना आपण सगळे बंधुत्वाच्या आणि प्रेमाच्या भावनेने एकमेकांशी जोडलेलो आहोत असे जाणवले.

नवीन नियुक्ती :

दि. १ नोव्हेंबर २०१० पासून बंधू यु.पी.धवन यांची क्रेस्ट खरगपूर येथे सहायक संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

भूतकाळाचे पुनरावलोकन

१९७६ मधील मे व जून या कालखंडामध्ये युरोपच्या प्रवासात पू. गुरुदेव बाबूजी महाराजांच्या सोबत होते. या प्रवासा-दरम्यान डेन्मार्क,जर्मनी,स्वित्झर्लंड, फ्रान्स व इटली या देशांना त्यांनी भेटी दिल्या. या भेटींचे व प्रवासाचे वर्णन 'सहजमार्ग इन युरोप' या पुस्तकाद्वारे प्रथम प्रकाशित करण्यात आले होते व नंतर त्याचे पुनर्प्रकाशन 'यात्रा-खंड १' या नावाने करण्यात आले आहे.

गुरुदेवांनी केलेल्या या प्रवासाच्या नोंदींमधून त्यांच्या व बाबूजींच्या नात्याचा संपूर्ण पट आपल्यासमोर उलगडला जातो. आपल्या प्राणप्रिय गुरुदेवांची त्यांनी घेतलेली काळजी, मिशनच्या कामकाजासाठी केलेले अविरत कष्ट, दर दिवशी १५ पेक्षा जास्त वैयक्तिक सिटिंग व कित्येक भाषणे देणे त्याचप्रमाणे गुरु व शिष्यामधील अत्युच्च दर्जाचे आध्यात्मिक संवादांचा या नोंदींमध्ये समावेश आहे.

या प्रवासादरम्यान पूज्य बाबूजी महाराजांकडून मिळालेली काही मौक्तिके :

'तत्वज्ञान हा विचार करण्याचा मार्ग आहे; योग हा कर्म करण्याचा मार्ग आहे तर साक्षात्कार हा केलेले मूळ पदावर आणण्याचा मार्ग आहे.'

प्रश्न : आपला संदेश काय आहे?
उत्तर : सर्वत्र शांती व विसंगती-विरहित विचार

प्रश्न : जीवन म्हणजे काय?
उत्तर :जीवनातले जीवन हेच खरे आयुष्य होय.

सुफी कवी सरमद याच्या कवितेचा दाखला देत बाबूजी म्हणतात:

"प्रेमाची वेदना वाऱ्यावर हेलकावे खाणाऱ्या फुलपाखराप्रमाणे आहे, जे निरुद्देश इकडे-तिकडे भटकत असते. परंतु पतंग प्रेमाच्या ज्योतीवर स्वत:ला जाळून घेतो."

ते पुढे म्हणाले, "आपले प्रेम असे असले पाहिजे. परमेश्वराला आपल्या हृदयात आणण्याकरिता हजारो वर्षांचा कालावधी लागतो, आणि फक्त काहींनांच ते जमते. मरण्यापूर्वी मरण पावणे हा एकच मार्ग आहे."

"माझा असा शोध आहे, की नरक हा पापी माणसांकरिता, स्वर्ग हा मूर्खांकरिता व ब्राईटर वर्ल्ड हे मुक्त झालेल्या आत्म्यांकरिता आहे."

जपानी पाहुण्यांची मणपक्कम भेट

एक चित्तवेधक अनुभव

दिनांक ९ सप्टेंबर रोजी जपान योग संस्थेच्या पन्नास सभासदांनी, अध्यक्ष सेन्सई तहारा होडो व उपाध्यक्षा श्रीमती ओगियामा किमिको यांच्या समवेत बाबूजी मेमोरिअल आश्रमाला भेट दिली व तेथे काही काळ व्यतीत केला. आश्रमाचे व्यवस्थापक बंधू सत्यनारायण यांनी या शिष्टमंडळाला आश्रम दाखविले व 'डी' विभागातील सभा-कक्षामध्ये माहितीपत्रके देऊन, प्रशिक्षकांची नावे व जपान येथे होणाऱ्या सत्संगाच्या ठिकाणांबद्दल सांगितले.

नागोया, जपान येथील प्रशिक्षक व मिशनच्या पदाधिकाऱ्यांची इंटरनेटवर या सभासदांशी गाठ घालून देण्यात आली, तेव्हा परस्पर-संवादात तंत्रज्ञानाचे महत्त्व उपस्थितांच्या निदर्शनास आले. भगिनी नित्या श्रीराम यांनी सर्वप्रथम जपानी भाषेत सहज मार्गाविषयी उपस्थितांशी संवाद साधला. मिशनचे जपानमधील प्रमुख बंधू श्रीराम यांनी जपानी भाषेत स्वत:ची ओळख करुन दिली. त्यानंतर भगिनी एरिना नाकामुरा, बंधू कनाए व भगिनी क्लॅरिसा बेग यांनी ध्यान-पद्धति व मिशनबद्दल सांगितले. जपानी भाषेत केलेल्या सादरीकरणाचे उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. दोघा-तिघांचा अपवाद वगळता हे सर्व सभासद जपान येथे योग-प्रशिक्षक म्हणून कार्यरत असणाऱ्या महिला आहेत.

बंधू दुराई यांनी या शिष्टमंडळाकरिता केलेल्या भाषणाचा अनुवाद यासमुहाचे मार्गदर्शक असणाऱ्या श्री. मार्कस या टोकियोतील भारतीय गृहस्थांनी केला. ऐंशी वर्षांहूनही अधिक वय असणाऱ्या सेन्साई यांनी प्रशंसोद्गार काढत अनेक वर्षांपूर्वी आश्रमाला दिलेल्या भेटीची आठवण करुन दिली. त्यावेळी आश्रमात केवळ शाकारलेल्या इमारती होत्या.

मिशनच्या जपानमधील सेवांचा नि:संकोचपणे लाभ घेण्याची विनंती पाहुण्यांना करण्यात आली. चहा व अल्पोपहाराचा आस्वाद घेऊन सायंकाळी ६.३० वाजता ते जपानच्या प्रवासासाठी रवाना झाले.

तामिळनाडू– दक्षिण विभाग– एक नवीन प्रयत्न

तामिळनाडू येथील ग्रामीण विभागात मिशनच्या प्रसाराला चालना देण्याच्या उद्देशाने बंधू ए.पी. दुराई यांनी दि. ३ ते ६ सप्टेंबर दरम्यान कन्याकुमारी व तिरुनेलवेली जिल्ह्यांचा दौरा केला. केवळ मूठभर अभ्यासी असणाऱ्या केंद्रांवर (वडक्कनकुळम, नांगुनेरी व कोट्टारम) त्यांनी लक्ष केंद्रित केले. तसेच नवीन ग्रामीण विभागांमध्ये (पनगुडी, तोवालै, राधापुरम, चिदंबरपुरम, कोलियंगुळम, मनूर व करैयिरुप्पु) मिशनच्या प्रगतीची शक्यता आजमावण्याकरिता त्यांनी हा दौरा केला. घरी आयोजित केलेल्या सभा व काही खुल्या चर्चासत्रांच्या माध्यमातून बंधू दुराई यांनी भावी अभ्यासींशी संवाद साधला. सहज मार्गाची थोडीफार माहिती असणाऱ्या आपल्या परिचितांना मिशनमध्ये घेऊन येणारे अभ्यासी गुरुदेवांचे कार्य पुढे चालवित आहेत असे ते या वेळी म्हणाले.

दि. ३ सप्टेंबर रोजी बंधू दुराई यांनी कन्याकुमारी व कोट्टारम (नागरकोइल केंद्राचे उपकेंद्र) येथे खुल्या चर्चासत्रादरम्यान अभ्यासींबरोबर चर्चा केली. यानंतर त्यांनी नागरकोइल येथील ध्यान–कक्षाला भेट दिली व 'गुरुदेवांशी एकरूप कसे व्हावे?' या विषयावर अभ्यासींना आपले विचार मांडण्यास सांगितले. नागरकोइल येथून १० कि.मी. अंतरावर असणाऱ्या तोवालै येथे एका सभेत भाग घेऊन त्यांनी अभ्यासींच्या पद्धतिविषयक प्रश्नांना उत्तरे दिली. प्रशिक्षकांनी केलेल्या सादरीकरणामध्ये उपस्थित रंगून गेले होते.

दि. ४ रोजी नांगुनेरी व राधापूरम भागामध्ये घरगुती मेळाव्याचे आयोजन केले होते. त्यांनी नंतर कोलियंगुळम येथे एका घरी भेट दिली जेथे आजूबाजूचे शेजारी एकत्र जमले होते व भाषण ऐकल्यानंतर त्यांनी ध्यान सुरु करण्याची ईच्छा व्यक्त केली. त्यानंतर ते वडक्कनकुळम येथे परत आले व सत्संगाचे संचालन केले व अभ्यासींच्या साधनेविषयीच्या प्रश्नांना उत्तरे दिली.

रविवार दिनांक ५ सप्टेंबर रोजी बंधू दुराई यांनी वडक्कनकुळम केंद्रामध्ये एकदिवसीय कार्यक्रमामध्ये भाग घेतला. तिरुनेलवेली, नागरकोइल व कोट्टारम येथील ५० अभ्यासी यावेळी उपस्थित होते. सत्संगानंतर अभ्यासींची भाषणे, प्रशिक्षकांनी केलेले शंका–निरसन, समूह चर्चा, गुरुदेवांची डि.व्ही.डी. वरील भाषणे व गुरुदेवांच्या शिकवणुकीवरील सादरीकरणे असा कार्यक्रम झाला. त्यानंतर सुमारे २५ आमंत्रितांकरिता खुल्या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमानंतर २५ पैकी १२ आमंत्रितांनी प्रारंभिक सिटींगकरिता आपली नावे दिली.

दि. ६ सप्टेंबर रोजी तिरुनेलवेली आश्रमाला भेट दिल्यानंतर मनुर व करैयिरुप्पु या गावांमध्ये घरगुती मेळाव्यांमध्ये बंधू दुराई यांनी भाग घेतला.

या दौऱ्यामध्ये बंधू दुराई यांनी खालील निरीक्षणे नोंदवली :

गुरुदेवांनी पेरणी केलेले पीक आता कापणीसाठी तयार झालेले आहे. आता मिशनला गरज आहे ती काम करणाऱ्या व्यक्तींची, मुख्यत्वेकरून प्रशिक्षकांची, जे आपल्या केंद्राबाहेर जाऊन नवी केंद्रे उभी करतील व ही नवी केंद्रे स्वतंत्रपणे कार्यक्षम होईपर्यंत त्यांना आधार देतील.

- ❖नवीन अभ्यासींनी दर आठवड्याला वैयक्तिक सिटींग घेणे गरजेचे आहे.
- ❖प्रशिक्षकांनी नवीन अभ्यासींना साधना पद्धतीचे बिनचूक आकलन करून द्यावे.
- ❖घरगुती मेळावे व खुले चर्चासत्र अशा सांघिक कार्यक्रमांमुळे अभ्यासी व प्रशिक्षकांमध्ये एकता व बंधुत्वाची भावना वाढीस लागते.
- ❖अशा कार्यक्रमांमुळे उपस्थितांमध्ये उत्साहाची अनुभूती होते व गुरुदेवांचे काम करत असताना त्यांच्या उपस्थितीची जाणीव होते.

या दौऱ्यानंतर लवकरच दि.१० सप्टेंबर ते १२ सप्टेंबर दरम्यान तामिळनाडूच्या दक्षिण–विभागाचे प्रमुख बंधू श्री. टी.व्ही. विश्वनाथ राव यांनी विरुदुनगर, तूत्तुक्कुडी(तुतिकोरिन) व तिरुनेलवेली जिल्ह्यातील अनेक केंद्रांना भेटी दिल्या.

दि. १० सप्टेंबर रोजी चिन्न वल्लिक्कुळम येथील आश्रमात विरुदुनगर, अरुप्पुक्कोट्टै, करियपट्टी येथून आलेल्या ५० अभ्यासींकरिता श्री. विश्वनाथ राव यांनी सत्संगाचे संचालन केले. अभ्यासींची ओळख करून घेतल्यानंतर दुपारपर्यंत त्यांनी विचारांची देवाण–घेवाण केली.

कोविलपट्टी येथे सत्संगानंतर झालेल्या साधनेबद्दलच्या प्रश्नोत्तरांच्या कार्यक्रमात सुमारे २० अभ्यासी सहभागी झाले होते.

दि. ११ सप्टेंबर रोजी अरुप्पुक्कोट्टै उपकेंद्राला भेट देऊन त्यांनी सत्संगाचे संचालन केले व सुमारे २५ अभ्यासींबरोबर बातचीत केली. त्याच सायंकाळी श्रिविल्लिपुत्तूर येथे सुमारे ४५ अभ्यासींकरिता सत्संग व त्यापाठोपाठ चर्चेचा कार्यक्रम झाला. आश्रमाकरिता जमिनीची खरेदी करण्याकरिता अभ्यासींनी पुढाकार घेतला आहे.

दि. १२ सप्टेंबर रोजी राजपाळयम येथे बंधू राव यांनी संचालित केलेल्या सत्संगाकरिता सुमारे ७० अभ्यासींची उपस्थिती होती. यानंतर साधना पद्धति व चारित्र्याची जडण–घडण या विषयांवर अर्ध–दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

बंधू राव तिरुनेलवेली जिल्ह्यातील तेनकाशी या ठिकाणी दुपारी पोहोचले व संध्याकाळी स्थानिक तसेच पुळीयंगुडी व कडैयनल्लूर उपकेंद्रातील अभ्यासींकरिता त्यांनी सत्संगाचे संचालन केले. 'सहज मार्गाबद्दल मला काय समजले आहे' व 'स्वत:मध्ये काय बदल घडलेले जाणवले' या विषयांवर अभ्यासींनी आपले विचार व्यक्त केले.

तेनकाशी नंतर बंधू राव यांनी पुळीयंगुडी उपकेंद्राला भेट दिली. तेथे सध्या सुमारे ३५ अभ्यासी आहेत. तेथून रात्री त्यांनी तिरुप्पूर करिता प्रयाण केले.

वडक्कनकुलं

नन्गुनेरि

जबलपूर (मध्य प्रदेश) येथे प्रशिक्षकांचा विभागीय मेळावा:

दि. २१ व २२ ऑगस्ट २०१०.

या मेळाव्याची सुरुवात प्रशिक्षकांसाठी नुकत्याच वितरित झालेल्या DVD संचाच्या प्रसारणाने झाली. बंधू सचिन सिन्हा यांनी आश्रम व अभ्यासींची संख्या दाखविणारा मध्यप्रदेशचा नकाशा दाखविला. बंधू डॉ. एन. वी. देशपांडे यांनी त्यांच्या संशोधित भाषणामधून सांगितले कि नेहमीच्या प्रशिक्षणाविरुद्ध या मार्गामध्ये प्रशिक्षकांच्या कार्यामध्ये प्रथम त्यांना क्षमता दिली जाते व त्यानंतर त्यांना कार्य दिले जाते व त्यातुनच त्यांना शिकता येते व प्रगती साध्य करता येते हे. हे सहजमार्गाचे वेगळेपण आहे. दहा नियमांमधून काही महत्वाचे प्रश्न सगळ्यांसमोर चर्चेकरिता मांडले गेले.

काही प्रशिक्षकांनी आपले अनुभव इतरांपुढे मांडले. त्यानंतर एक प्रश्नोत्तराचा कार्यक्रम व एक खेळ झाला व एक ध्वनीचित्रफीत दाखविण्यात आली.

दुसऱ्या दिवशीही पुन्हा एक ध्वनीचित्रफीत दाखविण्यात आली. या विभागामध्ये काम करीत असलेल्या प्रशिक्षकांबद्दल सर्वांना माहिती देण्यात आली व त्यानंतर निबंधलेखन स्पर्धेचे विभागीय समन्वयक बंधू नवीन मिश्रा यांनी प्रशिक्षकांनी देण्याचे अहवाल, पद्धती व अनुभव याबद्दल वक्तव्य केले.

जेवणानंतर बंधू आनंद परमार यांनी "ई–मेल व संस्थेची वेबसाईट" यावर सविस्तर भाषण केले ज्याचा सर्वांनाच फायदा झाला. सुमारे ५०% लोकांना संस्थेच्या नवीन वेबसाईटबद्दल माहिती नव्हती असे दिसून आले. बंधू सचिन सिन्हा यांनी "गुरुदेवांना स्वत:मध्ये सामावून घ्या" या विषयावर एक भाषण दिले. यानंतर विभागीय प्रमुखांनी मध्यप्रदेशसाठी असणारे 'व्हिजन २०११' चा आराखडा त्यातील १० प्रमुख मुद्द्यांसह सर्वांसमक्ष सादर केला.

मध्यप्रदेशातील कार्यकलापांचा कार्यभार सांभाळणाऱ्या बंधू राजेश रावरेकर यांनी स्वयंसेवक व स्मृती (SMRTI) च्या समन्वयकांसमवेत झालेल्या बैठकींचा वृत्तांत सादर केला व सांगितले कि, पुढील वर्षाच्या घडामोडींचा अराखडा तयार झाला आहे व लवकरच तो सगळ्यांसमोर प्रस्तुत केला जाईल.

तामिळनाडू (उत्तर विभाग) केंद्रप्रमुख व प्रशिक्षक प्रमुखांची बैठक

तामिळनाडू व अंदमान निकोबार द्वीपसमूहामधून ५२ सहभागी ११ सप्टेंबर रोजी चेन्नई येथील मणपक्कम आश्रमामध्ये एकत्रित झाले होते.

कार्यक्रमाची सुरुवात संयुक्त सचिव बंधू ए. पी. दुरै व विभागीय प्रमुख बंधू एस. प्रकाश यांच्या संबोधनाने झाली.

सहभागींचे गट अगोदरच तयार केले गेले होते व सहभागी पूर्ण तयारीनेच यावेत यासाठी त्यांना चर्चेसाठी विषयदेखील आधीच दिले गेले होते. "अभ्यासींच्या अध्यात्मिक उत्थानासाठी उचलली जावीत अशी पाउले", "केंद्रांच्या प्रगतीमध्ये सातत्य", "अभ्यासींच्या चारित्र्यामध्ये योग्य बदल" व "मूल्याधारित शिक्षणामधून युवकांकडे जास्त लक्ष" हे ते विषय होते. संस्थेचे साहित्य वाचण्याचे महत्व, स्वयंसेवा, आंतरीक साधना, इतरांसाठी प्रार्थना, चांगले वातावरण निर्मिती, अभ्यासींना गुरुदेवांची योग्य रीतीने दिली गेलेली ओळख, शिस्त, प्रेमपूर्वक साधना, सतत स्मरण, जाणीव व भावना यातील फरक जाणण्याची गरज, नैतिक मूल्ये, सामूहिक कार्य यासारख्या महत्वाच्या बाबींवर यामध्ये चर्चा झाली. यामधून बरेच काही शिकायला मिळाले आणि विचार करून आंमलात आणण्यासाठी बऱ्याच गोष्टी यातून समोर आल्या.

वेल्लोरचे बंधू लक्ष्मीनारायण यांनी वैयक्तिक सिटींग व प्रशिक्षकांनी आपल्या केंद्राबाहेर प्रवास करण्याचे महत्व यावर भाषण दिले. ते म्हणाले की अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रमामुळे सर्वच केंद्रामध्ये मोठा बदल दिसुन येतो आहे व त्यांनी नवीन केंद्राचा शोध व विभागीय पातळीवरील मेळाव्यांचा यावेळी पुरस्कार केला.

स्मृती(SMRTI), सभासद नोंदणी, प्रकाशन, लेखाविभाग यासारख्या मुख्य विभागांच्या सादरीकरणामुळे याविभागांमध्ये होत असलेल्या कामाची कल्पना आली व या विभागांना केंद्रांकडून काय अपेक्षित आहे हे देखिल यावेळी कळून आले.

आपल्या समारोपाच्या भाषणामध्ये बंधू एस. प्रकाश यांनी या चर्चांमधून समोर आलेल्या काम करावयाच्या १० मुद्यांना सादर केले. या मुद्द्यांमध्ये सगळ्या केंद्रांमध्ये अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे, खुले चर्चासत्रे/घरगुती मेळावे/स्वागतकक्ष, वैयक्तिक साधना व सिटींग्जवर भर देणे, प्रशिक्षकांची एकमेकांच्या केंद्रांना भेट, रविवारचे कार्यक्रम, नवीन केंद्रांचा विकास, युवकांचा विकास, उत्सवामध्ये भाग घेणे, मणपक्कम आश्रमाला भेट आणि संस्थेच्या साहित्याचा परिणामकारक वापर इत्यादींचा समावेश होता. यानंतर सहभागी गुरुदेवांना भेटले आणि गुरुदेवांनी त्यांना सांगितले, " यापुढे चांगले काम करा."

अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम

अलाहाबाद

रांची

स्मृतीने (SMRTI) तयार केलेला अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम भारतातील केंद्रांमध्ये राबविला जात आहे. अभ्यासींच्या म्हणण्यानुसार, या प्रशिक्षणामुळे त्यांना साधनेची उत्तम समज निर्माण होण्यास व साधना नियमितपणे तसेच नेटाने करण्यास प्रोत्साहन मिळाले. यात सहज मार्ग साधनेच्या सर्व अंगांचे स्पष्टीकरण उत्तम प्रकारे केलेले असल्याने दैनंदिन साधने बाबतच्या ब-याच शंकांचे निरसन याद्वारे होत असते. या प्रशिक्षणास उदंड उत्साह आणि प्रतिसाद लाभला. गुरुदेवांच्या ध्वनीचित्रफीतीतील (ऑडियो-व्हिडीयो) स्पष्टीकरणामुळे साधनेच्या बाबतीतील प्रश्नांची उत्तरे मिळाली; असेही ब-याच अभ्यासी बंधू-भगिनींनी सांगितले. या प्रशिक्षणाद्वारे दैनंदिनी (डायरी) लिहिणे, मिशनच्या साहित्याचे नियमित वाचन करणे, तसेच सत्संगास नियमितपणे जाणे या आणि इतर ब-याच गोष्टींचे महत्त्व समजण्यासही मदत झाल्याचे अभ्यासींना जाणवले.

केंद्र	दिनांक	सहभागी केंद्रे	आयोजक
सत्यमंगलम	२९ ऑगस्ट	सत्यमंगलम,पुलियंपी आणि अन्नुर केंद्र	बंधू अशोकन, बंधू अण्णादुरै,आयोजक: कोइम्बतुरचे प्रशिक्षक बंधू पलानी कुमारन
के. जी. एफ. केंद्र	५ सप्टेंबर	के. जी. एफ., मुलाबागल आणि कुप्पम(आ.प्र.)	बंधू शशिकांत आणि बंधू श्रीधर, मैसुर केंद्र
जमशेदपूर	१८ सप्टेंबर		भगिनी अनसूया रामचंद्रन
ऊना(हि.प्र.)	३ ऑक्टोबर	ऊना आणि जवळची केंद्रे बजुरा (कुल्लु) पालमपूर	ए.टी पी. गट जम्मु
मुंबई	१४ ऑगस्ट		बंधू मणी
नांदेड	२२ ऑगस्ट		डॉ. परिहार आणि डॉ. चौधरी, चिखली केंद्र
सेडम, गुलबर्गा	५ सप्टेंबर		
रायचूर, उत्तर कर्नाटक	१२ सप्टेंबर		बंधू प्रल्हाद पाकणिकर
गुलबर्गा	१९ सप्टेंबर		बंधू निजालिंगप्पा आणि बंधू महेश देशपांडे
कुर्नूल	२२ ऑगस्ट		
अनंतपूर	२९ ऑगस्ट		
नंद्याल	१२ सप्टेंबर		
कडपा	१९ सप्टेंबर		
हिंदुपूर	१० ऑक्टोबर		स्मृती चौबे,भगिनी नीरा वर्मा, भगिनी इंदु पांडे, बंधू अतुल जैन
रांची	२ ऑक्टोबर		
विरुदूनगर	२६ सप्टेंबर	विरुदूनगर श्रीविलिपुतुर,शिवकाशी, कोवीलपी	बंधू बाल सुब्रमण्यम
रांची	२६ सप्टेंबर	बिहार आणि झारखंड	भगिनी अनसूया रामचंद्रन

विरुदूनगर

अनंतपूर

सेडं

प्रादेशिक परिसंवाद, अलुवा

दि. १० ते १२ सप्टेंबर २०१० या काळात अलुवा येथील विभागीय आश्रमात तीन दिवसांचा प्रादेशिक परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. परिसंवादाची सुरुवात सत्संगाने झाली. पहिल्या सत्रात

स्मृतीने (SMRTI) तयार केलेल्या सीडीवर आधारित मूलभूत प्रशिक्षण कार्यक्रमाचे संचालन करण्यात आले. भोजनानंतर अभ्यासींनी दिलेल्या भाषणावर चर्चा झाली. तिरुप्पूरच्या बंधू एन.प्रकाश यांचे परिसंवादाच्या संदर्भात एक छोटे भाषण झाले. तत्पश्चात सतसंग झाले. त्यानंतर एका अनौपचारिक गप्पांमध्ये बंधू एन.प्रकाश म्हणाले की, गुरुदेव केरळमधील सहजमार्गाच्या प्रगतीवर खूश आहेत.

दि. ११ रोजी सकाळी ६:३० वाजता प्रशिक्षकांसाठी व त्यानंतर ९ वाजता सर्वांसाठी सत्संग आयोजित करण्यात आला होता. गुरूदेवांचे निरीक्षण,आज्ञापालन, आणि त्यांचे अनुकरण या मुद्यांवर आधारित बंधू प्रकाश यांनी अत्यंत माहितीपूर्ण सादरीकरण सर्वांसमोर सादर केले. डॉ.सी सतीशन यांनी मल्ल्याळी भाषेतून सुंदर भाषण दिले. भोजनानंतर अभ्यासींनी आपापली मते व्यक्त केली. तेथील स्थानिक रहिवाशांसाठी विभागीय प्रमुख बंधू के. यु. मोहन यांनी सार्वजनिक सभेचे आयोजन केले होते. दिनांक १२ रोजी सकाळी ७:३० वाजता सत्संगानंतर बंधू सुंदरम आणि बंधू प्रकाश यांच्या समारोपाच्या भाषणाने चर्चासत्राची सांगता झाली. ७ केंद्रांमधून आणि अलुवाच्या आसपासच्या ७ उपकेंद्रांमधून सुमारे २३० अभ्यासी यात सहभागी झाले होते.

अलाहाबाद

दि.१५ ऑगस्ट २०१० रोजी अलाहाबाद केंद्राने अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. अलाहाबाद आणि झाशी केंद्रातून सुमारे ३५ प्रशिक्षणार्थी यात सहभागी झाले होते. केंद्रप्रमुख बंधू त्रिवेदी यांनी स्वागतपर भाषण दिले.भगिनी ललिता शर्मा आणि स्वयंसेवकांचा चमू यांनी आयोजित केलेल्या या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन बंधू उमाशंकर (सचिव) यांच्या हस्ते करण्यात आले.
प्रत्येक सत्रानंतर प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. दि. ५ सप्टेंबर २०१० रोजी अलाहाबाद केंद्राने आणखी एक अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम राबविला. यामध्ये अलाहाबाद, झाशी , बांदा, थारवाई आणि बामपूर या केंद्रामधून ३६ प्रशिक्षणार्थी सामील झाले होते.

तिरुप्पूर (दक्षिण तामिळनाडू)

दि. २५ सप्टेंबर पासून नॅशनल सर्व्हीस स्कीम अंतर्गत के.एस.सी. विद्यालय, तिरुप्पूर येथील २५ विद्यार्थ्यांचे डायमंड ज्युबिली पार्क येथे ६ दिवसांचे शिबिर भरवण्यात आले होते. विद्यार्थी दररोज आश्रमाच्या साफसफाईचे काम करित असत व दुपारी २:३० वाजता गुरुदेवांच्या शिस्त आणि चारित्र्य या विषयीच्या विचारांवर चर्चा केली जाई.

रविवार दि. ३ ऑक्टोबर रोजी चेट्टीपलायम योगाश्रम तिरुप्पूर येथे खुल्या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. सत्संगानंतर विभागप्रमुख बंधू टी.वी. विश्वनाथ राव यांनी सहभागींचे स्वागत केले. सुमारे ४५ निमंत्रित यात सहभागी झाले होते. केंद्रप्रमुख बंधू आर.षण्मुगम आणि बंधू एन. प्रकाश यांनी सहजमार्ग पद्धतीची सविस्तर माहिती दिली. त्यापैकी २२ जणांनी मिशनमध्ये प्रवेश घेण्याची इच्छा दर्शविली.आणि त्याच दिवशी पहिली सिटींगही घेतली.

रायपूर

रायपूर केंद्राने दि.२३ सप्टेंबर रोजी ६५ सी.आर. पी. एफ. मुख्यालय, बाराडेरा रायपूर येथे 'जवानांच्या दैनंदिन जीवनात ध्यानधारणा' या विषयावर खुले चर्चासत्र आयोजित केले होते. बंधू संदीप दत्ता डी.आय.जी.पी.–सी.आर.पी.एफ. रायपूर यांनी कार्यक्रमाची सुरुवात केली.

भगिनी रजनी दत्ता यांनी मानवी मनाच्या आंदोलनाने निर्माण झालेल्या अस्थिरतेबद्दल माहिती दिली.

आणि या अस्थिर मनाच्या आंदोलनास कमी करण्याची गरज स्पष्ट करुन सांगितले. बंधू दीपक त्यागी यांनी जवानांच्या दैनंदिन जीवनात असलेली ध्यानाची भूमिका स्पष्ट करून सांगितली. त्यांनी सांगितले की, ध्यानामुळे आपण केवळ परमात्माशीच जोडले जातो असे नाही तर आपल्या कुटुंबाचा आणि देशाचा सांभाळही अत्यंत सहजपणे आणि समाधानाने करु शकतो. बंधू त्यागी यांनी जवानांच्या शंकांचे निरसन करून त्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. बऱ्याचश्या समस्या या ताण–तणाव, अनामिक भीती, नैराश्य,अनिद्रा यांच्याशी निगडीत होत्या. बंधू त्यागी यांनी ध्यानाच्या समर्थतेवर जोर देऊन सांगितले की सर्व समस्यांच्या निवारणाची ही एक उल्लेखनीय पद्धती आहे.

मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षणावर परिसंवाद व कार्यशाळा, अलुवा, केरळ

केरळच्या अलूवा केंद्राने इ. ५ वी ते १० वीच्या मुलांसाठी केरळच्या विभागीय आश्रमामध्ये मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षण कार्यक्रमावर दि. २९ ऑगस्ट रोजी चर्चासत्राचे आयोजन केले. वेगवेगळ्या शाळांमधील ४५ विद्यार्थ्यांनी या चर्चासत्रामध्ये भाग घेतला. या चर्चासत्राचे ऊद्घाटन राजश्री शाळेच्या मुख्याध्यापिका सुज़न जॉन यांनी केले. मुलांसाठी पाठांतर व वक्तृत्वस्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. शेवटी प्रश्नमंजूषेचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाला मुलांकडून अतिशय ऊत्साहवर्धक प्रतिसाद मिळाला. पालकांकडून मिळालेल्या प्रतिक्रियादेखील ऊत्साहवर्धक होत्या. यावेळी मुख्याध्यापकांनी त्यांच्या शाळेच्या शिक्षकांसाठीदेखिल असेच एक सत्र आयोजित करण्याची विनंती केली. यानंतर लगेचच दि. २५ सप्टेंबर रोजी एक दिवसीय मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षण कार्यशाळा काडंगलूर येथील राजश्री एस.एम.एम. शाळेच्या शिक्षकांसाठी आयोजित करण्यात आली. बंधू ए. माधवन, बंधू टि.पी.नारायणन, बंधू ए. जयप्रकाश, व बंधू विजयकृष्णन हे यावेळी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते.

मुल्याधारित आध्यात्मिक प्रशिक्षण, गुजरात

दक्षिण गुजरातसाठी बडोदा केंद्राच्या बंधू विलास भोंडे यांची मुल्याधारित आध्यात्मिक प्रशिक्षणासाठीचे समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. संपूर्ण गुजरातमध्ये मुल्याधारित प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम शिक्षकांपर्यंत पोहोचवण्यासाठी व त्यांना प्रशिक्षित करण्यासाठी स्वयंसेवकांच्या गटांना तयार करण्यात येत आहे. बडोदा, वापी, भावनगर, अहमदाबाद, सुरत, आणंद, दमण, नवसारी, वलसाड, भूज, जामनगर आणि राजकोट येथील स्वयंसेवक अनेक शाळांना भेटी देत आहेत, पुस्तिका तयार केल्या जात आहेत, स्वयंसेवकांना प्रशिक्षित केले जात आहे व हे सगळे चांगल्याप्रकारे समजेल असे अभासींसमोर सादर केले जात आहे.

काही शाळांनी तर मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षणाचे वर्ग देखिल सुरु केले आहेत. हा संपूर्ण कार्यक्रम स्मृतीच्या (SMRTI) नवीन अभ्यासक्रमावर आधारित असून सर्व संबंधितांमध्ये याविषयी प्रचंड कुतुहल निर्माण झाले आहे. शिक्षकांनी या कार्यक्रमाचा संपूर्ण लाभ ऊठवला व ते अभ्यासक्रमातील नवनवीन कल्पनांनी आकर्षित झाले. जसे की, शरीराच्या वेगवेगळ्या अवयवांचे दाखवलेल्या मोठ्या प्रतिकृती, फ्लॅशकार्ड्स, संगणकाद्वारे सादरीकरण, छोट्या ध्वनीचित्रमुद्रिका, विविध स्पर्धात्मक खेळ (जिंका जितके जास्त जिंकता येईल तितके) व गटचर्चा.

याचवेळी असा निर्णय घेतला गेला की प्रत्येक अर्ध्या दिवसाच्या कार्यक्रमामध्ये वेगवेगळ्या गोष्टींचा अंतर्भाव केला जावा ज्यायोगे त्यांना स्वत:मध्ये नवरत्नाचा विकास करण्यात मदत होईल.

सध्या गुजरातच्या दोन्ही विभागांमध्ये १० वेगवेगळ्या केंद्रातील १३ शाळांमध्ये मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षण कार्यक्रम प्रायोगीक पद्धतीवर राबविण्याची योजना आहे. अभ्यासक्रमाचे गुजरातीमध्ये भाषांतर करण्याचे काम भगिनी तारा चौहान व त्यांच्या भाषांतरकार गटाकडून करुन घेण्यात येत आहे.

कनकपूरा, दक्षिण कर्नाटक

बंधू स्वामी व बंधू व्यंकटेश जे कनकपूरा येथील लायन्स क्लबचे सदस्य आहेत, त्यांच्या पुढाकाराने मुल्याधारित आध्यात्मिक प्रशिक्षणावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. दि. १३ सप्टेंबर रोजी लायन्स उच्चप्राथमिक शाळा आणि हंसवाहिनी उच्च प्राथमिक शाळेच्या शिक्षकांसाठी एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते ज्यामध्ये ३६ शिक्षकांनी भाग घेतला.

भगिनी माधूरीने ५ मिनीटाच्या शांतीप्रार्थनेने चर्चासत्राची सुरुवात केली. श्री रामचंद्र मिशनबद्दल थोडक्यात माहिती सांगून 'मूल्य म्हणजे काय', 'मूल्यांची गरज', 'शिक्षक व आई-वडिलांची भूमिका', 'मुलांसाठी उपयुक्त वातावरण निर्मिती' या विषयी बोलल्या. खेळ, गट चर्चा सत्र, आणि प्रॉप्स या सर्व गोष्टींचा या सत्रा मधे समावेश होता. सहभागींमध्ये अत्यंत उत्साहाचे वातावरण होते. यावेळी शिक्षक व्हि.बी.एस.इ. च्या अभ्यासक्रमाला शालेय अभ्यासक्रमात सामील करण्याचा ठाम निश्चय करून परतले.

कनकपुऱ्याचे व्हि.बी.एस.इ चे स्वयंसेवक नियमितपणे शाळांना भेटी देऊन एका अनौपचारिक चर्चासत्रांमधून शिक्षकांशी संवाद साधतील ज्यायोगे त्यांना या अभ्यासक्रमाला शाळेत लागू करण्यास काही मदत हवी असेल तर तिचाही विचार केला जाईल. आणि त्यांच्या कडून याबद्दल मागोवाही घेतला जाईल.

रांची

फक्त ज्ञानासाठी असणारे ज्ञान ज्याचा आपल्या समाजबांधवांसाठी काही उपयोग नाही, हे एखाद्या पूर्णविरामासारखे आहे. आणि ज्याचा अंत पूर्ण विकल झालेल्या एका बंद रस्त्याच्या तोंडाप्रमाणे आहे. शिक्षण जो पर्यंत मुलांच्या चारित्र्यामध्ये बदल घडवत नाही आणि जोपर्यंत त्यांना जीवनमूल्ये शिकवीत नाही तोपर्यंत ती एक अर्थशून्य क्रिया ठरते. भारतातील सर्व विद्यार्थ्यांना शारीरिक आणि मानसिक ताकद मिळते की नाही ज्यायोगे भारत एक वेगळा देश म्हणून गणला जाईल याकडे शिक्षणसंस्थानी लक्ष पुरवले पाहिजे. आम्हाला आमच्या प्राचीन वारश्यांचा अभिमान आहे आणि येणारा भविष्य काळही तितकाच उज्ज्वल असेल याबद्दल खात्री बाळगली पाहिजे. (डॉ.सरला बिरला)

संस्थापक सरला बिरला यांच्या या विचारसरणशी मेळ खात, रांची येथील व्हि.बी.एस.इ. च्या स्वयंसेवकांनी मूल्याधारित नवीन अभ्यासक्रमाची गरज याबद्दल चार तासाचे चर्चासत्र आयोजित केले होते. यामध्ये ५० शिक्षकांचा समावेश होता जे अत्यंत तन्मयतेने ऐकत होते. शाळेने स्मृतीचा (SMRTI) अभ्यासक्रम त्यांच्या शाळेत कसा लागू केला जाईल याबद्दल पुढे चर्चा करण्यास संमती दर्शविली.

या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात सुनंदा चौहान, अनिता तिवारी, शीतल चौहान, अनुराधा चौहान, संगीता सोमाणी, मनोज तिवारी, डॉ. श्याम नारायण, राम अवतार साहू, शोभा साहू व अरुण कुमार लाल यांचा समावेश होता.

उत्साही विद्यार्थी व तरुण

अहमदाबाद शिबीर

अहमदाबादच्या निरमा विद्यापिठातील प्रशिक्षणार्थीच्या गटाने श्री मिशनचा 'ध्यानाद्वारे मनाचे नियोजन'

असा फ़लक रस्त्यावर पाहिला. या मिशनबाबत अधिक माहिती मिळवण्याची जिज्ञासा त्यांना वाटल्यामुळे अडलज

आश्रमामध्ये शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. हे ९० मिनिटाचे शिबिर दि. २ ऑक्टोबर २०१० रोजी १९ ते २३ वयोगटातील सहभागींसाठी होते. हे शिबीर केंद्रप्रमुख बंधू जिग्नेश यांनी संचालित केले. उत्सुक सहभागींना सम्पर्क साधण्यासाठी त्यांच्या शहरातील केन्द्रप्रमुखाची माहिती देण्यात आली. फ़लकामुळे जिज्ञासूंनी मिशनकडे आकर्षित होण्याची ही एक मनोरंजक घटना होती.

सिद्दीपेट, आंध्र प्रदेश

नुकत्याच झालेल्या निबंधलेखन उपक्रम २०१० साठी श्री राम चंद्र मिशनने सुचवलेल्या विचार करण्यास प्रवृत्त करणाऱ्या

विषयांनी प्रेरीत होऊन गजवेल,आंध्रप्रदेश येथील महिलांसाठी असलेल्या सरकारी पदवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.

वेंकट रामण यांनी मनाच्या नियमनासाठीचे जागरूकता शिबीर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्याची विनंती

सिद्दीपेट आश्रमास केली. दि. ६ ऑक्टोबर २०१० रोजी विविध शाखेचे जवळजवळ ८० विदयार्थी या परस्पर संवादी शिबिरात सहभागी झाले होते. प्रशिक्षक 'ध्यानाद्वारे मनाचे नियमन', 'लहान वयापासून जीवनाचे ध्येय निश्चित करण्याची गरज' इत्यादी विषयांवर बोलले.

खानापूर, बेळगाव, उत्तर कर्नाटक

दि. ९ सप्टेंबर रोजी बेळगाव जिल्ह्यातील मराठा मंडळाच्या कला व विज्ञान महाविद्यालय खानापूर येथे 'वर्तमानकाळात उच्च शिक्षणात असलेली अध्यात्मिकता गरज' या विषयावर राज्यस्तरीय शिबीर आयोजित केले होते. महाविद्यालयाच्या स्मरणिकेमध्ये देखील लेख प्रकाशित करण्यासाठी श्री राम चंद्र मिशनला सहभागी होण्याचे आमंत्रण

देण्यात आले होते. संपूर्ण जिल्ह्यातून सुमारे १५० प्रतिनिधी व विद्यार्थी गोळा झाले होते.

मिशनच्यावतीने बंधू राजू काशामपूरकर यांनी प्रतिनिधीत्व केले. त्यांनी सध्याच्या काळातील अध्यात्मिक्तेची गरज, मनुष्य

जीवनाचे खरे ध्येय व तरुणांनी करावयाचा अध्यात्मिक सराव या विविध पैलूंवर भाष्य केले. त्यानंतर ज्यांनी मिशनच्या साधनेमध्ये रुची दर्शवली अशांना मिशनची माहिती पुस्तिका देण्यात आली.

प्रगत युवा शिबीर

बेंगलुरु येथे तीन दिवसीय निवासी प्रगत युवा शिबीर दि १० ते १२ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आले होते. विषय होता 'आम्ही भविष्य'. उद्देश होता या विभागातील तरूणांना साधनेच्या विविध प्रश्नांचे सखोल आकलन – दहा सूक्ते, परिवर्तनास विरोध, ध्येयाची स्विकृती, निस्वार्थी सेवा, भविष्यातील कार्यकर्ते म्हणून असलेली जबाबदारी इत्यादींसाठी एक व्यासपीठ मिळवून देणे. सहजमार्गाचा तीन वर्षापेक्षा जास्त अनुभव असलेले २० ते ३५ वयोगटातील ३१ अभ्यासी या शिबीराला हजर होते.

ज्यावर भर द्यावयाचा आहे ते विषय तरूणांशी चर्चा करून शिबीरापूर्वीच ठरवण्यात आले होते. समन्वयकांनी, त्यांचा आतापर्यंतच्या प्रवासातून तात्विक दृष्टीकोणाबरोबर प्रत्यक्ष व्यवहारातील अंतरंगाचे यथार्थ ज्ञान आणि ते गुरुदेवांसोबत राहुन त्यांच्यापासून काय शिकले ते भरीव पुराव्यानिशी सिद्ध करुन उत्कृष्ट काम केले.

याला मिळालेल्या प्रतिक्रिया प्रोत्साहित करणाऱ्या होत्या. काही अभ्यासींनी मत व्यक्त केले कि प्रथमच त्यांना त्यांच्या मन आणि ह्रदय यातला फरक समजला. काही म्हणाले कि ते आता साधनेला वाहून घेतील आणि हे शिबिर त्यांना सहजमार्ग साधनेच्या विविध पैलूंच्या सखोलतेपर्यंत घेऊन गेले.

मंगलोर, दक्षिण कर्नाटक

दि. १८ सप्टेंबर रोजी रामचंद्र मिशनतर्फे श्रीनिवास इंस्टीट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज येथे 'परिचय शिबिर' आयोजित करण्यात आले होते. सदर कार्यकमाचे संचालन बंधू प्रसाद कृष्णा यांनी केले. त्यांच्या व्याख्यानास १२० एम.बी.ए विद्यार्थी उपस्थित होते. भाषणाचा विषय 'मनाच्या नियमनासाठी ध्यान' असा होता. बंधू कृष्णा यांनी जीवनातील ध्येयाची गरज व वेळेचा सदुपयोग याबाबत स्पष्टीकरण केले. त्यामुळे वर्तमान क्षणांचा सदुपयोग अर्थपूर्ण व परिणामकारक करण्यासाठी त्यांनी श्रोतृवर्गास सहजमार्ग आजमावण्याचे आवाहान केले. त्यांनी थोडक्यात सहजमार्ग पद्धती स्पष्ट केली. प्राचार्य आणि उपप्राचार्य समाधानी झाले व १६ विध्यार्थ्यांनी सहजमार्गात सामिल होण्यास उत्सुकता दाखविली व आपली नावे नोंदविली.

खानापूर

बेंगलुरु

श्री राम चंद्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र
नोव्हेंबर २०१०
खंड ३ अंक ६

प्रकाशाचे केंद्र

सोनेपत, हरियाणा

सोनेपत आश्रम फ़ाजीलपूर वीजकेंद्राजवळ सोनेपत–बहलगड रस्त्यालगत सेक्टर १२ भाग ४ येथे आहे. आश्रम सोनेपत रेल्वे स्थानकापासून ४ किमी. व बस स्थानकापासून ३ किमी अंतरावर आहे. नवी दिल्ली–चंदीगड राष्ट्रीय महामार्ग क्र.१, बहलगड चौक ५ किमी अंतरावर आहे. हरियाणा शहर विकास प्राधिकरणाने सन २००३ साली ११४० चौ.मी. चा भूखंड वितरीत केला आहे. जमिनीची संपूर्ण किंमत अदा करण्यासाठी सोनेपत केंद्रातील अभ्यासीनी हातभार लावला व भूमीपूजनाचा सोहळा गुरूदेवांच्या हस्ते ५ डिसेंबर. २००३ रोजी पार पडला.

दि. ९ आक्टोबर २००५ रोजी सर्वात लहान अभ्यासीच्या हस्ते पायाभरणीचा दगड ठेऊन बांधकामास सुरूवात करण्यात आली. आश्रमाचे बांधकाम आक्टोबर २००७ मध्ये पूर्ण झाले. सोनेपत केंद्रातील अभ्यासींनी उदारपणे, मोठ्या मनाने केलेल्या आर्थिक मदतीमुळे व सेवाकार्यामुळे बांधकामाच्या खर्चात कपात झाली.

पहिला सत्संग दि. २ फ़ेब्रुवारी २००९ रोजी बसंतपंचमीच्या दिवशी संचालित केला गेला. आश्रमाच्या इमारतीचे उद्घाटन गुरूदेवांच्या हस्ते दि.७ फ़ेब्रुवारी २००९ रोजी करण्यात आले. त्या प्रसंगी बोलताना गुरुदेव म्हणाले, “जर देवाला धर्म असेल, किंवा सांगण्यासारखे काही असेल किंवा त्याला स्वत:ला व्यक्त, प्रकट करायचे असेल तर देव म्हणजे प्रेम. म्हणूनच जेव्हा आपण प्रेम करण्यास शिकतो, तेव्हा आपण देवासारखे बनतो.”

आश्रमाचे तळमजल्यावरचे बांधकाम ४१६२ चौ. फूट आणि पहिल्या मजल्यावर ४०२७ चौ. फूट आहे. तळमजल्यावर २ मोठे कक्ष आहेत ज्यात प्रत्येकी १०० अभ्यासी राहू शकतात. ध्यानकक्ष पहिल्या मजल्यावर असून त्याला दोन्ही बाजूला ओसरी व आत उंच व्यासपीठ आहे. ध्यानकक्षाच्या घुमट्यात सुंदर झुंबर लावले आहे. तळमजल्यावरील सुसज्ज व प्रशस्त कार्यालयातले संगणक व प्रोजेक्टर अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रमासाठी पण वापरला जातो.

आश्रमात नियमितपणे रविवारी सकाळी व बुधवारी संध्याकाळी सत्संग व गुरुदेवांच्या वाढदिवसांदिवशी भंडारा आयोजित केले जातात. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी पूर्ण दिवसीय कार्यक्रम व अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम नियमीतपणे आयोजित केले जातात.

आश्रमाची इमारत तिन्ही बाजूंनी उघडी असून एका बाजूला श्रीराम शिक्षा सदन आहे. दोन भव्य प्रवेशद्वारांनी आश्रम रुंद सेक्टर रस्त्याला जोडला गेला आहे. सुंदर हिरवळ, फुलझाडांचे वाफ़े व पाण्याचा कारंजा आश्रमाच्या सौंदर्यात भर घालतात.

To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org
© 2009 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. “Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", “SRCM”, “Constant Remembrance” and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.